**निशाणी क्र. २३ वरील आदेश.**

**CNR MHOS12-000011-2019**

वादीने दावा दुरुस्ती अर्ज दाखल करुन कथन केले आहे की, दावा दाखल करताना कागदपत्र उपलब्ध नसल्याने दाव्याचे मिळकती व रस्त्यासबंधी नजरी नकाशा दिलेला नाही. त्यामुळे दाव्यात व तुर्तातुर्त मनाई अर्जात दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे. पुढे त्याने कथन केले आहे की, दाव्यात परिच्छेद ४ व तुर्तातुर्त अर्ज परिच्छेद ५ नंतर परिच्छेद ५–अ वाढविण्यास परवानगी द्यावी तसेच दाव्यात परिच्छेद क्र. ४ मध्ये व परिच्छेद क्र. ७ मध्ये रस्त्याचे या शब्दा अगोदर अर्धवट असा शब्द लिहिण्यास परवानगी द्यावी. वादीने पुढे कथन केले आहे की, दुरुस्तीमुळे प्रतिवादींच्या बचावास बाधा येत नाही. दुरुस्तीमुळे निकोप न्यायनिर्णय होणार आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावा.

२. प्रतिवादी नं. १ व २ यांनी म्हणणे दिलेले नाही. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी म्हणणे दिले आहे की, दाव्यातील लॅक्यूना भरुन काढण्यासाठी अर्ज दिला आहे. दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. दाव्यात अमरजित कन्स्ट्रक्शन, गिरवली मार्फत रस्ता तयार केला आहे असे कथन केले आहे. आजरोजी तो रस्ता अर्धवट आहे असे म्हटल्यावर दाव्याचे स्वरुप बदलून जाईल वगैरे. त्यांनी अर्ज फेटाळावा अशी विनंती केली आहे.

३. अर्जदाराच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींच्या वकीलांनी युक्तीवाद केला नाही. प्रतिवादींच्या वकीलांना आज वारंवार पुकारुन देखील आजही युक्तीवाद केला नाही.

४. पुर्ण दावा पाहिला असता असे दिसून येते की, कांही ठिकाणी नविन रस्ता तयार केला असे कथन केले आहे व कांही ठिकाणी रस्ता तयार करत आहेत असे नमुद केले आहे. दाव्यातील मागणी रस्ता करु नये म्हणून आहे. त्यामुळे दावा संपुर्ण एकत्रात (read as whole) वाचला असता असे दिसून येते की, रस्ता पुर्ण झाला असे म्हटलेले नाही. त्यामुळे दुरुस्ती केली तर कबूली माघारी घेतली असे होत नाही. दुरुस्तीमुळे वादीला त्याची केस निश्चीत मांडता येईल. नजरी नकाशा दिल्याने वादीस दाव्यात काय म्हणायचे आहे हे स्पष्ट होणार आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी दुरुस्ती आवश्यक वाटते. दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही, प्रतिवादींच्या बचावास बाधा येत नाही, परंतू प्रतिवादींना जादा कैफियत द्यावी लागणार आहे, त्यामुळे प्रतिवादी खर्च मिळण्यास पात्र आहेत. सबब आदेश–

## आदेश

१. वादींनी प्रत्येक प्रतिवादीस प्रत्येकी रु.५००/– खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादींनी पुढील तारेखपर्यंत खर्चाची रक्कम प्रतिवादींना द्यावी किंवा न्यायालयात जमा करावी. वादींनी पुढील तारेखपर्यंत मागणीप्रमाणे दुरुस्ती करावी, व दुरुस्त दाव्याच्या नकला दाखल कराव्यात.

३. वरीलप्रमाणे पुर्तता केली नाही तर हा आदेश अपोआप रद्द झाला असे वादीने समजावे.

स्वाक्षरीत/– ३.६.१९

दिनांक –०३/०६/२०१९

(श्रीपाद श. देशपांडे)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, भूम.